बातमीपत्र

## पोलीस आयुक्तालय,सोलापूर शहर

**माहिती कक्ष, दि ०३ एप्रिल २०२४**

---

मा. पोलीस आयुक्त, श्री. एम राजकुमार यांच्या अध्यक्षतेखाली रमजान ईद चे अनुषंगाने सोलापूर शहरातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी दि. ०३/०४/२०२४ रोजी १६.०० वा. पोलीस आयुक्त कार्यालय सोलापूर येथे शांतता समिती सदस्य, सोलापूर महानगर पालिकेकडील अधिकारी, आर टी ओ चे अधिकारी, महावितरण चे अधिकारी, शहर काझी,मुस्लीम बांधव यांची संयुक्तपणे शांतता कमिटी बैठक आयोजित केली होती.

सदर बैठकीची प्रस्तावना श्रीमती डॉ. दिपाली काळे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे) यांनी करुन बैठक आयोजन करण्यामागचा उद्देश स्पष्ट केला.

त्यानंतर बैठकीस उपस्थित शांतता समिती सदस्य व इतरांनी समस्या/सुचना मांडल्या. त्यानंतर सदर सुचनेचे संबंधित महानगर पालिका अधिकारी यांनी सदर कामाची रुपरेषा बघुन समस्या सोडविण्यात येतील असे सांगितले.

मा. पोलीस आयुक्त सो यांनी बैठकीस उपस्थित लोकांचे स्वागत करुन मांडलेल्या अडी-अडचणीचे निरसण केले. उत्सव साजरा करताना बऱ्याचवेळी कायदेशीर बाबींचे उल्लंघन होत असते, कोणीही कायदा हातात घेऊ नये, सोशल मिडीयावर कोणीही आक्षेपार्ह मेसेजेस, फोटो, पोस्ट व्हायरल होत असल्याचे निदर्शनास आल्यास त्याबाबत त्वरीत पोलीस यंत्रणेस कळवावे, कोणताही अनुचित प्रकार निदर्शनास आल्यास पोलीसांशी संपर्क साधावा, शांतता समिती सदस्य व नागरीकांनी आपल्या परीसरातील बेकायेदशीर बाबींची माहिती पोलीसांना दिली पाहिजे. नियमांचे पालन करावे, योग्य बदोबस्त नेमु असे सांगुन रमजान ईद निमित्त शुभेच्छा देवून बैठकीला आलेल्या उपस्थितांचे आभार मानले.

सदर बैठकीस, मा. पोलीस आयुक्त श्री. एम राजकुमार, मा. श्री. अजित बोऱ्हाडे, पोलीस उप आयुक्त (मुख्यालय), मा. श्रीमती डॉ. दिपाली काळे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), मा. श्री. विजय कबाडे, पोलीस उप आयुक्त (परीमंडळ), श्री अशोक तोरडमल सहाय्यक पोलीस आयुक्त विभाग-१, श्री. अजय परमार, विभाग-२, श्री. यशंवत गवारी, वाहतुक शाखा, श्रीमती. प्रांजली सोनवणे, गुन्हे शाखा, तसेच सोलापूर महानगर पालिकेकडील नगर अभियंता श्रीमती सारिका अकुलवार,आर टी ओ श्रीमती. अर्चना गायकवाड, महावितरण अति.कार्यकारी अभियंता श्री. प्रदिप मोरे, व तसेच, सर्व पोलीस ठाणे/शाखा प्रभारी अधिकारी व पोलीस अंमलदार, व शांतता कमिटीचे सदस्य, व पत्रकार बंधु उपस्थित होते.

तरी उपरोक्त प्रमाणे शांतता समिती सदस्य यांचे समवेत घेण्यात आलेल्या बैठकीतील ठळक मुद्यांबाबत आपले लोकप्रिय दैनिकात प्रसिध्दी करुन पोलीस प्रशासनास सहकार्य करावे.